महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १५३ वा दिनांक : १४/०३/२०२५ वार : शुक्रवार

## लाडक्या बहिणींसाठी आदिवासी आणि समाजकल्याण विभागाचे सात हजार कोटी पळवले



**मुंबई** : राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा ३ व आदिवासी विभागाचा तब्बल ४ हजार कोटींचा निधी वळता केल्याची बाब समोर आली आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करत थेट अर्थमंत्री अजित पवार यांना जाब विचारण्याचे संकेत दिलेत.

लाडकी बहीण योजनेचा राज्याच्या सरकारी तिजोरीवर मोठा भार पडला आहे. त्यामुळे अर्थविभाग वेगवेगळ्या विभागांचा निधी पळवून या योजनेसाठी निधी उभा करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यातच यंदाच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी तब्बल ३६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी आदिवासी व दुर्बल घटकांच्या विकासासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या समाजकल्याण व आदिवासी विभागाचा सुमारे ७ हजार कोटींचा निधी वळता करण्यात आला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, अर्थखात्याने समाजकल्याणचा ३ हजार कोटी, तर आदिवासी विभागाचा तब्बल ४ हजार कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळता केला आहे. यामुळे या दोन्ही खात्यांच्या विविध योजनांना कात्री लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावर या दोन्ही खात्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, घटनात्मक तरतुदींनुसार या दोन्ही खात्यांचा निधी इतरत्र वळवता येत नाही. पण आता या विभागाचा हक्काचा पैसा लाडकी बहीण योजनेला वळता करण्यात आल्याची माहिती आहे. ही योजना सर्वांसाठी असेल तर आदिवासी व दलित महिलांनाही त्याच योजनेतून योग्य ती तरतूद केली पाहिजे.

दुसरीकडे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनीही यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, नियमानुसार दोन्ही विभागांना निधी देणे बंधनकारक आहे. संविधानामध्ये त्याची तरतूद आहे. पण त्यानंतरही या दोन्ही विभागांचा निधी हा इतर ठिकाणी वळवण्यात आला. लाडकी बहीण योजना सुरू ठेवायची असेल, तर त्यासाठी पैसा उभा करणे आवश्यक आहे. पण यासाठी योजनेसाठी दलित व आदिवासी समाजासाठी असणारा निधी वळवण्यात आला आहे. आता अर्थसंकल्पावरील चर्चेत देण्यात येणाऱ्या उत्तराकडे आमचे लक्ष असेल. तसेच हा निधी का वळवण्यात आला याचे कारणही आम्ही अजित पवारांना विचारू.

## नीतेश राणेंना कोणाच्या धर्माबाबत बोलण्याचा अधिकार नाही - विजय वडेट्टीवार



**मुंबई** : नीतेश राणेंची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार म्हणाले. नीतेश राणेंना कोणत्या धर्माच्या विरोधात बोलण्याचा अधिकार नाही. राणेंना मंत्रिमंडळात ठेवणार का? याबाबत मुख्यमंत्री फडणवीसांना विचारणार असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले.

भाजपचे आमदार आणि मंत्री नीतेश राणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात मुस्लीम नव्हते, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर मटणाच्या दुकानांबाबत हिंदू खाटीकांसाठी त्यांनी मल्हार सर्टिफिकेट हे नवे धोरण आणले. यावरून त्यांच्यावर विरोधकांकडून टीकेची झोड उठवली जात आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही नीतेश राणे यांच्यावर जोरदार निशाणा साधत घणाघाती टीका केली.

नीतेश राणेंना हलाल हवे की नाही यासाठी मंत्रिपदाची शपथ दिली नाही. कोणत्या धर्माविरोधात बोलण्याचा त्यांना काय अधिकार आहे. नीतेश राणे यांना कोणत्या धर्माबाबत बोलण्याचा कोणताही अधिकार नाहीये. याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार आहोत. अशा मंत्र्यांना आपल्या मंत्रिमंडळात ठेवणार का? त्यांच्या विधानाला तुमचे समर्थन आहे का? याबाबत त्यांना महाराष्ट्राच्या जनतेला सांगावे लागणार आहे.

होळीच्या सगळ्यांना शुभेच्छा आहेत. होळीच्या शुभेच्छा देत असताना ही होळी विविध रंगाची आणि विविध ढंगाची असते. ही होळी एकमेकांना आनंद देऊन जाते. रंग एकच धरू नका, त्याला मजा येणार नाही. अनेक रंग लावा, त्या रंगात रंगून जा. तुम्ही एक रंग लावाल तर तुमच्याकडे एकच रंग राहील, मात्र, त्या रंगातून आनंद मिळणार नाही, अशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी नीतेश राणेंवर टीका केली.

## १९ मार्च रोजी किसानपुत्र आंदोलनाचे महाराष्ट्रात अन्नत्याग आंदोलन

**अंबाजोगाई** : १९ मार्च रोजी महाराष्ट्रातील लाखो शेतकरी व किसानपुत्र अन्नत्याग करून आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना सहवेदना प्रकट करणार आहेत. ठिकठिकाणी सामूहिक उपोषणाचे कार्यक्रम व सहवेदना सभा होणार आहेत. केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या घटून १० ते १५ टक्के राहिली आहे. तरीही तेवढ्याच शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, जेवढ्या ५० ते ६० टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून होते. याचा अर्थ असा की, केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबावरील संकट अधिक वाढले आहे. महाराष्ट्रात दररोज ७ ते ८ आत्महत्या होत आहेत. म्हणून या वर्षी किसान पुत्रांनी १९ मार्चला अन्न त्याग करून संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी केले आहे.

ज्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येऊ लागले, त्या कुटुंबातील आत्महत्या टळल्या आहेत, असे दिसून येते. राहिलेल्या १०-१५ टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न कसे येईल याचा तातडीने विचार केला पाहिजे. सरकारी वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी १८ हजार रुपये महिना ठरवले आहे. तसे १८ हजार रुपये महिन्याला या कुटुंबांना पोचवण्याची तरतूद सरकारने करावी. यासाठी इतर अनुदान बंद करावी लागली तर ती बंद करावी, अशी सूचना अमर हबीब यांनी केली आहे.

संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाच्या सामूहिक आत्महत्येला १९ मार्च रोजी ३९ वर्षे होतात. या काळात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु लोकसभा व विधानसभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा साधा ठराव देखील करण्यात आला नाही. राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रती संवेदनाशून्य झाले आहेत.

१९ मार्च हा शेतकरी सहवेदना दिवस आहे, या दिवशी लोकसभा-विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत, यासाठी उपाययोजना करावी, असे आवाहन अमर हबीब यांनी केले. त्यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना तसे पत्रही पाठविले आहे.

लोकसभा-विधानसभा दखल घेईल की नाही, हे आज सांगता येत नाही, तरी आज गावो गावच्या ग्रामपंचायती, ग्रामसभांनी 'आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली' अर्पण करणारा ठराव करून महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींना पाठवावा, अशी सूचना त्यांनी केली आहे.

१९ मार्च रोजी, अमर हबीब व त्यांचे सहकारी नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील उमरा या गावात अन्नत्याग करणार आहेत.या गावच्या भीमराव सिरसाट या शेतकऱ्याने काही वर्षांपूर्वी तहसील कार्यालयात फाशी घेऊन आत्महत्या केली होती. या गावात दुपारनंतर सहवेदना सभा होईल, अशी माहिती अमर हबीब यांनी दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ मार्च २०२५

## पडेगावच्या पुलात अडकला हजारो टन कचरा, ड्रेनेज च्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी.



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** : पडेगाव येथिल सम्शान भूमी च्या लगत असलेल्या नाल्यात हजारो टन कचरा अडकल्यामुळे उघड्यावरील ड्रेनेज चे पाणी साचून आहे त्यामुळे या पाण्याच्या दुर्गंधीने मुख्य रस्तयावरून येणारे जाणारे वाहतूदार व स्मशान भूमीत अंत्यविधीला येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीला सामोरे जावा लागत आहे.पडेगाव येथिल म.न.पा.घंनकचरा व्यवस्थापनाचे या घटनेमुळे तिनतेरा वाजलेले दिसून येत आहे. रस्त्याने जाणारे येणारे लोक पुलावरून येथे कचरा टाकतात त्यामुळे कचऱ्याचे ढीग पुलात अडकवून ड्रेनेज अडकत आहे. त्यामुळे पुलावर लोखंडी जाळ्या उभ्या करून कचरा टाकणारांना प्रतिबंध करावा अशी मागणी नागरिकांच्या वतीने होत आहे. येथून वेरूळ, खुलताबाद, दौलताबाद ला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटक जा ये करत असतात तसेच पडेगाव येथिल रहिवाशी या दुर्गंधीने हवालदिल झाले आहे म.न.पा.ने हा कचरा काढून नाला स्वच्छता करण्यात यावा व नाल्यात सोडलेले ड्रेनेज चे पाणी भूमिगत गटाराद्वारे वाहून न्यावे अशी मागणी येथिल नागरिकांकडून होत आहे.

## पुण्यात औद्योगिक विकासाला चालना

**पुणे** : पुणे जिल्ह्यामध्ये अधिकाधिक औद्योगिक गुंतवणूक व विकास व्हावा यासाठी उद्योगस्नेही धोरण राबविण्यात येत आहे. उद्योगांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यालाही प्रशासनाचे उच्च प्राधान्य असून कोणत्याही घटकाकडून त्रास होत असल्यास उद्योगांनी खुलेपणाने, निर्भिडपणे त्याची माहिती द्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले. एमसीसीआयए येथे आयोजित औद्योगिक संघटना, सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम, मोठे उद्योजक, बँकर्स यांच्या औद्योगिक गुंतवणूक परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेश राजपूत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबाने, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी आदी यावेळी उपस्थित होते.

राष्ट्राच्या आणि राज्याच्या विकासाला व अर्थव्यवस्थेला गती देण्याचे काम उद्योग क्षेत्र करते असे सांगून डॉ. पुलकुंडवार म्हणाले, राज्यात अधिकाधिक गुंतवणूक यावी यासाठी उद्योगांना सर्व ते सहकार्य करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश असून त्यादृष्टीने शासन काम करत आहे. महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (मैत्री 2.0) पोर्टल या एकाच व्यासपीठावरुन उद्योगांना सर्व परवानग्या, सुविधा देण्याची व्यवस्था तयार करण्यात आली असून त्यामुळे गुंतवणुकीला व उद्योग उभारणीला चालना मिळणार आहे.

विभागात उद्योग उभारणी, त्यांच्या पायाभूत सुविधांच्या अडचणी, असामाजिक तत्त्वांकडून येणारे अडथळे आदींच्या अनुषंगाने उद्योगांशी संवाद साधण्यासाठी प्रशासन कायम उपलब्ध असून दर तीन महिन्यांनी उद्योगांसोबत आढावा घेण्यात येईल. जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग आले असल्याने आता खासगी क्षेत्रात उद्योग उभारणीला चालना देणे गरजेचे आहे. त्यासाठी जिल्ह्यात खासगी क्षेत्रातही रस्ते, पाणी आदी पायाभूत सुविधा चांगल्या उपलब्ध आहेत. त्या अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या धोरणात्मक सुधारणांच्या अनुषंगाने शासनाकडे प्रयत्न करण्यात येतील.

## कविता हा साहित्य प्रकार अवघड असून तो अभ्यासाने साध्य करता येईल - सरिता उपासे



**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनेमराठी भाषा गौरव पंधरवडा तसेच जागतिक महिला दिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यालयात बुधवारी (ता.१२) रोजी निमंत्रित कवयित्रींचे विशेष कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सदस्या तथा विरशैव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव सुरेखाताई मलंग होत्या. या वेळी बोलताना सरिता उपासे म्हणाल्या की, कथा लेखन करताना आपला विषय मांडताना शब्दांची मर्यादा नसते. आपण कथा लहान मोठी ठरवून लिहिता येते पण कविता कमी शब्दात मांडायची तर त्यासाठी अभ्यास, सराव यांची गरज असते असे सांगत त्यांनी त्यांच्या दोन वेगवेगळ्या विषयांवरील कविता सादर केल्या आणि उत्तम दर्जाची कविता कशी निर्माण होते यावरमार्गदर्शन केले. विचार मंचावर शिला मुदगडे, केंद्र प्रमुख, गटशिक्षण कार्यालय, उमरगा डॉ. शशि कानडे स्त्रीरोग तज्ज्ञ भाग्यश्री गुंड-पवारसदस्या, विधिज्ञ समिती उमरगाआदींची प्रमुख उपस्थिती होती.

आरंभी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.निमंत्रित कवयित्रींच्या कवी संमेलनाच्या अध्यक्षा सरिता उपासे या होत्या. या कवी संमेलनात निमंत्रित कवयित्रींच्या कविता नी रंगत आणली. कविसंमेलनाची सुरुवात डॉ. शुभांगिनी महाजन यांच्या कवितेने झाली. रेखा सुर्यवंशी यांनी वीर रसाची कवित म्हणून गेल्या की... दुष्टांना संहारण्याचीआम्हाला परवानगी हवी जिजाऊंची लेक बनून वसवू दुनिया नवी. तर तूझ्या हाती गोंजारत मज पदराखाली अमृत पिता, उमलण्या आधी कळीचा घोट का ग घेता ? असा सवाल करत सुमन पवार (नाई चाकूरकर) च्या कवयित्रीने स्त्रीभ्रूणहत्याच्या प्रश्नाला हात घातला. स्त्री जीवना संबंधीचा धागा पकडून कवयित्री ॲड. फरहिन खान-पटेल म्हणतात... संतती आहे तुझ्या ही पोटी ....गर्व करु नको आयुष्या मधी.. पृथ्वीचे चक्र आठवणीत ठेव...फिरणार कधी ना कधी.स्री पुरुष जगण्याची तऱ्हा मांडताना कवयित्री शशीकला राठोड म्हणते पुरुष गेला की घर उजाड होते... स्री गेली की गुढग्याला बाशिंग तयार असते.माता माझी माय माझी या कवितेतून आर्त विनवणी करीत प्रा. कान्होपात्रा शिंदे म्हणतात....जन्म मला घेऊ देसुंदर सुंदर जीवन हेसु नयनांनी पाहू देकळी माझी उमलू दे.तर कोण आहे कोणाचे ...जसे नदीचं किनारे...माझे सांगून मन झाले वेडे.. कोण पहात नाही कोणाकडे ही वेदना संवेदनेतून प्रा.अनुराधा इंगळे यांनी मांडली. मालती बारस्कर यांनी बांधावरचं झाड या कवितेतून बागेतील फुलझाडे आणि बांधावरचं झाड यांची तुलना करून कविता सादर केली.त्या म्हणतात,इतक्यात पाहिले मी... उन्हातून येताना कष्टकरी...नजर त्याची विसाव्या साठी सावलीचा शोध करी.... जाऊन बसतो तो झाडाखाली सावलीत.....मी आणि चिमणा दिवसभर काम करुअतिरिक्त काम अन् जोडधंदा ही करुजमेल तसे हप्ते फेडू.....असा संसार पट मांडणारी कविता सादर केली. प्रा. कान्होपात्रा शिंदे यांनी.......ॲड. शुभदा पोतदार यांनी......प्रा. सरोज सगर यांनी......शिला मुदगडे यांनी सखी ही कविता सादर केली.सखी बंधनाचे हे धागे करुनी सैलस्वच्छंदी मनी जगून घे आता तरी ही मुक्त स्वातंत्र्याच आस अधोरेखित केली आहे. प्रियंका गायकवाड, प्रा. सरोज सगर, आदी कवयित्रीनी स्री सुलभ भावना व्यक्त करणाऱ्या कविता सादर केल्या.कार्यक्रमात सर्व उपस्थित कवयित्री, मराठी भाषा विषय शिक्षिका निर्मला चिकुंद्रे, उषा सगर यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अवंती सगर यांनी केले तर सुत्र संचालन मसाप सदस्या उषा सगर आणि वंदना सगर यांनी केले.आभार प्रदर्शनाची जबाबदारी ज्योती समदुर्ले-सगर यांनी पार पाडली.

कार्यक्रमास मराठवाडा साहित्य परिषद सदस्या मधुरा निंबाळ, रुपा कांबळे, कमल शिंदे, सविता सगर, सुवर्णा चौधरी, सुनिता बारस्कर, सिमा सगर, अनुसया पसरकल्ले आदीसह रसिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ मार्च २०२५


## महिला

महिला आता शिकू लागली
व्यवसाय, नोकरी करू लागली
घरसंसार सांभाळत गावचाही
कारभार पाहू लागली

नव्या जबाबदाऱ्या पेलवू लागली
कीर्तनात दंगताना रंगमंचही गाजवू लागली
नैतिकतेचे धडे देताना अनैतिकतेवरही
अंकुश ठेवण्यास धजाऊ लागली

खेळासोबत युद्धाचेही मैदान गाजवू लागली
स्वदेशाप्रमाणेच दूरदेशीही संचारू लागली
जळात असो की अंतराळात धैर्याने वावरू लागली

राजकारण, समाजकारण आणि प्रशासनातही
स्वतःला सिद्ध करू लागली
पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून
तर कधी कधी पुरुषांच्याही पुढे जाऊन

"जरी मी महिला नंबर माझा पहिला"
म्हणत पुढे पुढेच जाऊ लागली
पुढे पुढे जाऊ लागली.


**संजय जाधव शिऊर,**
**ता. वैजापूर, जिल्हा छ. संभाजीनगर**
**मो. ८२०८९५८८०५**



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


# महानुभाव साहित्य हा मराठी साहित्याचा मूळ प्रवाह - डॉ. सर्जेराव जिगे




**छत्रपती संभाजीनगर :** सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी इ.स. १२ मार्च १२३४ रोजी सालबर्डीच्या अरण्यात बारा वर्षाच्या प्रदीर्घ मौनातून बाहेर येत, प्रथमच सशाला निमित्त करून पारध्याच्या माध्यमातून संपूर्ण समाजाला अहिंसेचा संदेश दिला. या दिवशी स्वामींच्या मुखातून प्रकट झालेले, मराठी भाषेच्या इतिहासातील उपलब्ध असे पहिले वाणीमय (वाङ्मय) वचन आहे. त्याचे स्मरण आपल्याला असायला हवे. आपण सर्वांनी मराठी भाषेचे अभिमानी म्हणून उत्सव केला पाहिजे. या हेतूने प्रतिती प्रतिष्ठानच्या वतीने मराठी भाषा वाङ्मय दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवीश्वर कुलभूषण दत्तवरदी आचार्य श्रीनागराज बाबा हे होते. यावेळी प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर यांचे विशेष व्याख्यान ठेवण्यात आले. अभिजात मराठी भाषा आणि महानुभाव वाङ्मय याविषयी त्यांनी आपले विचार मांडले. अभिजात मराठी भाषेच्या प्रक्रियेत महानुभाव साहित्याने सिंहाचा वाटा उचलला आहे. महानुभाव साहित्य नसते तर कदाचित मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला नसता. मराठी साहित्यात लीळाचरित्रासारखा स्वयंभू असा दुसरा ग्रंथ नाही. तो स्वतंत्र असा अद्वितीय ग्रंथ आहे. श्रीचक्रधरांनी मराठी भाषेचा आग्रह धरला. महानुभाव साहित्याचे योगदान आहे, असे म्हणण्यापेक्षा महानुभाव साहित्य हाच मराठीचा मूळप्रवाह आहे. मानवतावाद हे या साहित्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. महानुभाव साहित्य लिपीतून बाहेर काढून नव्या पद्धतीने मांडणी करणे आवश्यक आहे. महानुभाव संत आता पंथीय कोश फोडून बाहेर पडले आहेत. महानुभाव पंथाच्या सकळ लिपीचे अध्ययन आणि अध्यापन झाले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हस्तलिखित पोथ्यांचे जतन आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. असेही ते यावेळी म्हणाले. साहित्याचार्य श्रीसंतोषमुनी शास्त्री कपाटे यांनी महानुभाव साहित्य हे अभिजात साहित्य आहे. या साहित्यावर देश विदेशातील संशोधकांनी संशोधन केले आहे. कोणतेही साहित्य हे मैत्रीचा आणि शांतीचा मार्ग दाखवते. असे प्रतिपादन केले. आचार्यप्रवर म. सातारकर बाबा, सातारा, महंत श्रीफलटणकर बाबा, महात्मा श्रीसुदर्शनदादा कपाटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. चक्रधर कोठी उपाख्य मोहन बाभुळगावकरयांनी कार्यक्रमाची भूमिका मांडली. सूत्रसंचालन प्रा. दिपाली निकम यांनी केले तर सौ. दिपाली देशमुख यांनी आभार मानले. श्रीकृष्ण मंदिर, महानुभाव आश्रम, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे दुपारी ०४:०० वाजता कार्यक्रम पार पडला. ग्लोबल महानुभाव संघ, श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम ट्रस्ट, छ. संभाजीनगर जिल्हा महानुभाव समिती, सकल भोपे समाज, राऊळ महिला मंडळ, तिरीप फाउंडेशन आणि प्रतिती प्रतिष्ठानचे सर्व सदस्य यांचा कार्यक्रमास सहयोग लाभला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सरकारची भ्रष्टाचाऱ्यांशी पार्टनरशिप : जनतेने सावध रहावे - जरांगे पाटील

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारची भ्रष्टाचाऱ्यांशी पार्टनरशिप असल्याची तिखट टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. राज्यातील सामाजिक प्रश्न सोडवण्यासंबंधी आमची या सरकारकडून मोठी अपेक्षा होती. पण हे सरकार भ्रष्टाचाऱ्यांशी पार्टनरशिप करणारे निघाले. त्यामुळे जनतेने सावध राहण्याची गरज आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे पाटील गुरुवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, विद्यमान सरकार राज्यातील सामाजिक प्रश्न सोडवेल असा आमचा विश्वास होता. पण हे सरकार भ्रष्टाचाऱ्यांशी पार्टनशिप असणारे निघाले. असे असले तरी आम्ही संतोष देशमुख खून प्रकरण एकांगी पडू देणार नाही. जनतेने यासंबंधी वेळीच सावध व्हावे. सामान्य माणसांनीही मोठ्या ताकदीने उभे रहावे. धनंजय मुंडे यांच्या टोळीने सामाजिक आरोग्य बिघडवण्याचे व किचकट जातीयवाद सुर करण्याचे काम केले.

बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यातील जातीयवाद रोखण्यासाठी विविध पाऊले उचलली जात आहेत. यात त्यांनी बीड पोलिस दलातील कर्मचाऱ्यांच्या नेमप्लेटमधील आडनाव वगळण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता बीडमधील एसपीपासून सामान्य पोलिस कर्मचाऱ्यापर्यंत सर्वांना त्यांच्या नावाने ओळखले जाणार आहे. पत्रकारांनी याविषयी मनोज जरांगे यांना छेडले असता त्यांनी केवळ आडनावे काढल्याने जातीयवाद मिटणार नसल्याचे ठणकावून सांगितले. पोलिसांची केवळ आडनावे नेमप्लेटवरून वगळल्याने जातीयवाद मिटणार नाही. हे चूक आहे. सरकारने कायद्याचे उल्लंघन करू नये. नावे काढण्याऐवजी त्यांनी पोलिसांसहीत गुन्हेगारांची टोळी जेरबंद करावी. नावापुढील आडनाव काढल्याने जातीयवाद आणखी फोफावेल, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, सरकारने आम्हाला मराठा आरक्षणाच्या मुद्यावरील आमच्या ८ पैकी ४ मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. पण ते अद्यापही पूर्ण केले नाही. शिंदे समिती काम करत नाही. या समितीने किती नोंदी शोधल्या? कक्ष कुठे - कुठे सुरू झाले? यावर पुढे काहीच झाले नाही. आंतरवालीसह राज्यभरातील मराठा आंदोलकावरील गुन्हे अद्यापही मागे घेतले गेले नाहीत. महत्त्वाचे म्हणजे राज्यातील मराठा आमदारांवर जनतेने गुलाल उधळला आहे. त्यांना मोठे केले आहे. आता त्या आमदारांनी मराठ्यांच्या लेकरांसाठी पुढाकार घेतला पाहिजे. या आमदारांनी अधिवेशन संपण्यापूर्वी या प्रकरणी पुढाकार घेतला नाही तर जनता त्यांना पाहून घेईल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ मार्च २०२५


## विद्यार्थ्यांनी शिस्त अंगी बाळगून अभ्यासाशी प्रामाणिक राहिले पाहिजे - अपर पोलिस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी




**जालना :** महाविद्यालयीन जीवनात आपण ज्ञान संपादनासाठी प्रामाणिक राहिले पाहिजे. तसेच झोकून देऊन काम केले पाहिजे. कोणतेही काम आवड म्हणून केल्यास अधिक उत्तम. आपल्या कार्यावर आपला विश्वास असला पाहिजे. ज्ञानाचे, व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र असू द्या त्यात आपल्याकडील उत्तम कौशल्याचा वापर केला पाहिजे. शिस्त जर नसेल तर आपण जीवनात यशस्वी होऊ शकणार नाही म्हणून आपल्या कामाशी आपण प्रामाणिक राहिले पाहिजे असे प्रतिपादन अपर पोलिस अधीक्षक श्री.आयुष नोपाणी यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषिक प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे श्री. अरुणजी अग्रवाल, श्री. सुरेशजी अग्रवाल यांची उपस्थिती होती. यावेळी स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ. ओमप्रकाश चव्हाण यांनी वर्षभर घेतलेल्या विविध उपक्रमाचा आढावा घेतला.

बहुसंख्येने उपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांकडे बघून श्री. आयूष नोपाणी पुढे म्हणाले, तुमची उपस्थिती पाहून मला फार आनंद आणि समाधान वाटते. कारण अलीकडे महाविद्यालयात नियमित उपस्थित राहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. वर्गात बसून ज्ञान संपादन करण्यास आजची पिढी का घाबरत आहेत हे समजत नाही. जो विद्यार्थी महाविद्यालयात नियमित येतो, वर्गात बसतो, शिक्षकांचे मन लावून ऐकतो आणि महाविद्यालयातील विविध उपक्रमात सहभागी होतो;असाच विद्यार्थी करियर तर करतोच पण आयुष्याच्या लढाईत सुद्धा विजयी होतो. प्रेम, मैत्री असावी याबद्दल ते म्हणाले, मैत्री, प्रेम करणे हा काही गुन्हा नाही मात्र ती स्वच्छ आणि निकोप असावी. मैत्री मधून एकमेकांना ब्लॅकमेल करू नका दोघांसाठी ते घातक आहे आपले जीवन अमूल्य आहे त्याचा आनंदाने स्वीकार करा. मैत्री मधील लक्ष्मण रेषा ओलांडू नका. तसेच कोणतीही गोष्ट आपल्या पालकांपासून लपवू नका.आमचे पोलीस प्रशासनही या संदर्भात पाऊल उचलत असून आम्ही अशा प्रकारची प्रकरणी कशी हाताळावी यासाठी प्रशिक्षण देत आहोत. सुरक्षा मंत्र नावाचे पुस्तक आम्ही काढले असून; त्याद्वारे समाजात लैंगिक जाणीवांविषयी जनजागृती करत आहोत. हे पुस्तक अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल याचा आम्ही प्रयत्न करतोय. या पुस्तकात गुड टच-बॅड टच, पोक्सो कायदा, ऑनलाइन सुरक्षा, ऑनलाइन छळ, ताण-तणाव व्यवस्थापन, वाहतुकीचे नियम, उल्लंघन, सायबर सुरक्षा, इंटरनेट वापरताना सुरक्षिततेचे उपाय, आर्थिक फसवणूक कशी रोखावी याबद्दलची माहिती यात आहे. समाजात वाढणाऱ्या हिंसा आणि गुन्हेगारीबद्दल बोलताना ते म्हणाले की, महिला आणि बालकांवर मोठ्या प्रमाणावर लैंगिक अत्याचार होत आहेत. हे वास्तव असून, समाज आजारी असल्याचे हे लक्षण आहे. समाजातील लैंगिक विकृती नष्ट झाली पाहिजे. त्यासाठी आपण सर्वांनीच पुढे येणे गरजेचे आहे. एक नागरिक म्हणून अशा विकृती विरुद्ध आपण आवाज उठवला पाहिजे. पालकांनी सुद्धा आपल्या मुलांसोबत मोकळेपणाने बोलले पाहिजे. यासंदर्भातील कोणतीही बाब दुर्लक्षित करू नका. एखादा लहानसा गुन्हा कधीही मोठे स्वरूप घेऊ शकतो. म्हणून सावध राहिले पाहिजे. आपल्या कुटुंबात जेवढा संवाद चांगला तेवढे समाजातील प्रश्न कमी हे आपण ओळखले पाहिजे.

मोबाईलच्या होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल ते म्हणाले, मोबाईल ही आपली आवश्यक गरज असली तरी त्याचा तुम्ही गुलाम बनू नका. मोबाईलमध्ये तुम्ही अडकून बसला तर तुम्ही कोणतेही करिअर करू शकणार नाही. मोबाईल जेवढा विकासासाठी आवश्यक तेवढाच तो समस्याही निर्माण करतो. आभासी दुनियाला भुलू नका, त्यामुळे आपल्यात न्यूनगंड निर्माण होतो. यावेळी त्यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातल्या आणि हैदराबाद येथील आयपीएस प्रशिक्षणादरम्यानच्या काही आठवणी सांगितल्या.अध्यक्षीय समारोपात श्री. सुरेश अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन विविध शैक्षणिक परीक्षांमध्ये नामांकन मिळवून महाविद्यालयाचे नाव उंचवावे असे आवाहन केले. प्राचार्य कविता प्राशर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी संसदेच्या राजकन्या दंडाईत हिने मनोगत व्यक्त केले.यावेळी आयुष नोपाणी आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शैक्षणिक क्षेत्रात कामगिरी बजावणाऱ्या शिक्षकांचा आणि माजी विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.क्रीडा विभागातील पारितोषिकाचे सूत्रसंचालन डॉ.भिकुलाल सले यांनी केले तर सांस्कृतिक विभागाच्या पारितोषिकाचे सूत्रसंचालन डॉ. व्यंकटेश कोरेबोईनवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विलास भुतेकर यांनी केले तर प्रा. ओमप्रकाश चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी पालक, माजी विद्यार्थी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## महिला दिनानिमित्त आरोग्य शिबीर प्रज्ञा शिक्षण प्रसारक मंडळाचा उपक्रम



**छत्रपती संभाजीनगर (किशोर निर्भवने) :** जागतिक महिला दिन विविध सामाजिक उपक्रमातून साजरा होत असतांना गेल्या अनेकदिवसापासून सतत महिलांना सामाजिक, स्वावलंबी आणि निर्भर बनविण्याची जिद्द बाळगणाऱ्या प्रज्ञा शिक्षण प्रसारक मंडळाने महिलांच्या आरोग्याकडे लक्ष वेधत संस्था कार्यालयात महिला आरोग्य शिबिर राबवत महिलांना विविध आजाराची आणि आरोग्या बाबत निदाना संदर्भात माहिती अवगत करण्यात आले. डॉ. फातेमा यांनी या बाबतीत महिलांना मोलाचे आरोग्य विषयक मागदर्शन केले तर डॉ. रोज उबेद यांनी अत्यंत मोलाचे विचार मांडताना महिलांना मार्गदर्शन केले की महिलांनी स्वतःच्या आरोग्याची स्वतःच काळजी घेणे आज काळाची गरज आहे. महिलांचे आरोग्य निरोगी राहिले तर त्यांचे कुटूंब आनंदी राहूनन ते एक आनंदमय जिवन जगू शकतील अरोग्य आणि शिक्षण हया बाबींकडे महिलांनी प्राधान्याने बघावे. जेणे करून भविषयात त्यांचे जिवन अंधकारमय होणार नाही. या प्रसंगी संस्था अध्यक्षा कविता अहिरे यांनी आपल्या प्रस्ताविकेत संस्थेमार्फत

राबविल्या गेलेल्या स्तुत्य उपक्रमाचाइंगळे, उषा पाटील, शालीनी वानखेडे, आढावा घेऊन भविष्यात राबविण्यातआदिनी अथक परिश्रम घेतले. उन्हाची येणाऱ्या उपक्रमाबाबत आपली भूमिकाअत्यंत तीव्रता असून देखील असंख्य स्पष्ट केली. मलाबार ज्वेलर्सच्या वतीनेमहिलांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. उपस्थितांमधून लकी ड्रॉ. द्वारे. ट्रॅवलिंग बॅगप्रज्ञा शिक्षण प्रसारक मंडळाकडून बक्षिस स्वरूपात देण्यात आली. महिलांसाठी १ दिवसांची ट्रेनिंग व विविध प्रज्ञा शिक्षण प्रसाराच्या वतीनेप्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार आहे. उपस्थित महिलांना मोफत सॅनेटरी पॅडचेअशी महिती संस्थाच्या अध्यक्ष कविता वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वीअहिरे यांनी उपस्थित महिलांना करण्यासाठी डॉ. फातेमा, डॉ. रोज उबेद, डॉ.दिली.संस्थेच्या अध्यक्ष कविता अहिरे, संगिता गवई, श्रीमती प्रिती भारत जाधव,सचिव मनिष विसवाडीया यांनी उपस्थितांचे संस्था सचिव श्री. मनिष विसवाडिया,आभार मानले अनिता गंगावणे, विध्या चितळे, भारती


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ मार्च २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ९८ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

## सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत करा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



**छत्रपती संभाजीनगर :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे "सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटीत करा असा त्रिसुत्री ते सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत करा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका असा पंचसूत्री प्रवास आणि आपली भूमिका." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दोन्ही त्रिसूत्री व पंचसूत्री विधानाच्या १०१ व्या व ८३ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर ९८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा ९ मार्च २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाजाच्या उन्नतीकरिता केंद्रीय संस्था स्थापन करण्यासाठी ९ मार्च १९२४ ला मुंबई च्या परळ येथील दामोदर हॉल मध्ये बैठक बोलाविण्यात आली होती. ज्यात Educate, Agitate and Organise अर्थात शिकवा (सुशिक्षित करा) , चेतवा (संघर्ष करा) आणि संघटीत करा असा संदेश दिला होता. ज्यात लोकांना सुशिक्षित करा, त्यांच्यात आपल्या हीन अवस्थेबद्दल चीड उत्पन्न करा आणि त्यांची संघटना निर्माण असे अभिप्रेत होते. पुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेले पहिले संघटन म्हणजे बहिष्कृत हितकारिणी सभेचे ते ब्रीदवाक्य ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १९३६ च्या दरम्यान जात-पात तोडक मंडळातर्फे आयोजित लाहोर परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी बोलाविण्यात आले होते. त्या आयोजकांनी लिखित स्वरूपात भाषण उपलब्ध करून द्यायची विनंती केली होती. जे परिषदेत श्रोत्यांना, हितचिंतकांना उपलब्ध करून दिले जाणार होते. मात्र भाषण उपलब्ध करून दिल्यावर आयोजकांनी त्यात काही बदल सुचविले होते. ज्यावर प्रतिक्रिया देताना बाबासाहेब आंबेडकर उद्गारले की, यात "काना तर काय वेलांटी" सुद्धा बदलता येणार नाही. त्यामुळे ती परिषद पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र पुढे ती परिषद झालीच नाही. म्हणून हे लिखित भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचे निर्मूलन (Annihilation of Caste) या सदराखाली पुस्तक रुपाने प्रकाशित केले आहे. अशी परखड भूमिका घेणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी मात्र सदरील ब्रीदवाक्याचा क्रम बदलून शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा असे प्रतिपादन करीत असतात. ज्यामुळे संघटीत होण्यासाठी संघर्ष करावा लागतो, हे मात्र सोयीस्करपणे विसरतात. त्यामुळे आजपर्यंत आपण संघटीत होऊ शकलो नाही. परिणामी हक्क अधिकारासाठी करावा लागणारा संघर्ष अपूर्ण राहिल्याने समस्या जैसे थे! आ-वासून उभ्या आहेत. पुढे जाऊन आंदोलनाच्या दृष्टीने १८ ते २० जुलै १९४२ ला तीन दिवसीय अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेचे नागपूरात आयोजित करण्यात आले होते. ज्यात अखिल भारतीय दलित वर्ग महिला परिषद व समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांसाठी शेवटच्या दिवशी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात समाजाची प्रगती ही महिलांनी केलेल्या प्रगती वरून मोजता येईल, हे स्पष्ट केले होते. तसेच या परिषदेत सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत करा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका हीच आमच्या जीवनाची पंचसूत्री असा संदेश दिला होता. जेणेकरून शेवटच्या श्वासापर्यंत धीर न सोडता आपल्या हक्क अधिकारासाठी लढत राहिले पाहिजे.

सद्यस्थितीत आपल्या समाजात सर्व स्तरावर, सर्व क्षेत्रात नेतृत्वाची निर्वात पोकळी निर्माण झालेली आहे. ज्यामुळे समाजाची दुरावस्था होत चालली आहे. कमी अधिक प्रमाणात आपल्या सर्वांच्या समस्या सारख्याच आहेत. म्हणून एकत्रित येऊन संघटीत होण्यासाठी आपापसातील भांडणे मिटविली पाहिजेत. आणि आपल्या वैचारिक सिद्धांतानुसार जनमत तयार होण्यासाठी ते मोठ्या प्रमाणात सामान्य जनतेपर्यंत प्रसारीत केले पाहिजेत.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या कार्यशाळेला आल्यामुळेच त्रिसुत्रीचा खरा अर्थ कळाला आहे. व्यक्तीगत स्तरावर संघटीत होण्यासाठी अनेक अडचणी येतात. म्हणून आपण संघटीत होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. ज्यामुळे सहजगतीने व सुलभपणे कार्य पार पाडली जाऊ शकतील.

प्रमुख वक्ते एड. प्रवीण जाधव म्हणाले की, ज्या काळात आम्हाला शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला होता. त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला शिकण्याचा संदेश दिला आहे. केवळ शरिराने एकत्र येणे म्हणजे संघटीत होणे नव्हे! तर मानसिक दृष्ट्या एकत्रित आले पाहिजे. चळवळ तेच करीत असतात, ज्यांच्या डोक्यात विचारांची वळवळ सुरू असते. भिका-यांना भीक देणे ही सेवा आहे. म्हणून परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांना समाजसेवक ऐवजी समाज परिवर्तक असे म्हटले पाहिजे. ८० टक्के जनतेला ५ किलो धान्य रेशनवर द्यायची वेळ येणे ही राज्यकर्त्यांसाठी फार मोठी शरमेची बाब आहे. म्हणून धीर न सोडता शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिले पाहिजे. जगातील युनो सारख्या संघटना सुद्धा या त्रिसुत्री व पंचसूत्री चा वापर करतात.

याप्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, शिकलेल्या व्यक्ती सुद्धा रविवारच्या सुट्टीचा प्रबोधनासाठी सदुपयोग करताना दिसत नाहीत. आपण सर्व जण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक भांडवलावर जगत आहोत. अनेक कार्यक्रमात नेत्यांच्या गौरवीकरणावर भर दिला जातो. तरुण पिढी मोबाईलच्या आहारी गेल्यामुळे ती विधायक कार्यापासून दूर आहे.

प्रास्ताविक करताना एड. विलास रामटेके म्हणाले की, समाज संघटीत झाला तर समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू शकेल. शिवतरकर यांच्या विषयी कार्यकर्त्यांचा रोष होता. तो रोष संपुष्टात आणण्यासाठी आपण परस्पर सामंजस्याने वागले पाहिजे, अशी बाबासाहेब आंबेडकरांनी कार्यकर्त्यांची समजूत काढली होती. परिवर्तनाच्या कार्यात सुरूवातीला थोडेच लोक सहभागी होत असतात. बुद्धाने सुद्धा सुरूवातीला केवळ पाचच पंच वर्गीय भिक्खूला संदेश दिला होता.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने सर्व प्रतिनिधिंचे व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, प्रास्ताविक एड. विलास रामटेके व आभार मिलिंद बागूल यांनी व्यक्त केले. यावेळी गोविंद कांबळे यांनी 'भीमा हा विचार तुझा, पिंपळाच पान आहे.' हे गीत सादर केले. या कार्यशाळेला एड. प्रवीण जाधव, उद्योजक मिलिंद बागूल, गोविंद कांबळे, साधू आनंद, बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.